सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१८ | गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन



श्री. सुनील पाटील
पॅथॉलॉजिस्ट

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## दिनविशेष
३० एप्रिल

- शिवाजी महाराजांनी मुघलांच्या ताब्यात असलेल्या जुन्नर शहरावर हल्ला करून लुटले.
- महात्मा गांधींनी वर्ध्याजवळ सेवाग्राम आश्रम स्थापन केला.
- थेऊर येथील श्री चिंतामणी मंदिराच्या प्रांगणात श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या स्मृतिस्थळाचे उद्घाटन करण्यात आले.

# लाडक्या बहिणींनो, 'केवायसी'करिता उरले काही तास

## ३० एप्रिलची मुदत चुकल्यास थांबणार १५०० रुपये

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील महायुतीस सरकारसाठी अत्यंत महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठेच्या अशा 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेविषयी सातत्याने चर्चा सुरू असते. योजना बंद होणार असल्याची तसेच लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची, बोगस लाभार्थीकडून पैसे परत घेण्याची चर्चा होत असते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून यासंदर्भात योजना कधीही बंद होणार नाही, असे स्पष्टीकरण वारंवार दिले जाते.

महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी करताना काही नियम, अटी लागू केल्या होत्या. बनावट लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा होण्याऐवजी योग्य लाभार्थ्यांना लाभ मिळावा, यासाठी ई केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली. या ई केवायसी प्रक्रियेला वारंवार मुदतवाढ दिली गेली. आता ई केवायसी प्रक्रियेंतर्गत दुरुस्तीसाठी महिला व बालविकास विभागाने दिलेली मुदतवाढ ३० एप्रिल २०२६ रोजी म्हणजेच अवघ्या काही तासांत संपणार आहे. त्यामुळे ज्या महिलांना ई केवायसी दुरुस्त करून घ्यायची आहे त्यांच्यासाठी शेवटचे काही तास बाकी आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुतीसाठी तारणहार बनली आहे. या योजनेमुळेच महायुती पुन्हा सत्तेत आल्याचे म्हटले जाते. महाराष्ट्र सरकारच्या महिला व बालविकास विभागाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेतून राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी दरमहा १५०० रुपये दिले जातात. कधी त्या महिन्याचे पैसे लगेचच दिले जातात. कधी दोन महिन्यांचे पैसे एकाचवेळी दिले जातात. परंतु पैसे मिळत असल्याने लाडक्या बहिणी समाधानी आहेत. परंतु या योजनेचा काही बनावट लाडक्या बहिणीही लाभ घेत असल्याचे दिसून आल्याने त्यांना वगळून ज्यांना खरोखर गरज आहे अशा लाडक्या बहिणींनाच या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी ई केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले. ही योजना सुरू झाली असता लाभार्थी महिलांची संख्या दोन कोटी



४० लाखांच्या घरात होती. बहुसंख्य महिलांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्याने त्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. ज्या महिला शेतकरी पीएम किसान सन्मान आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ घेत असतील त्यांना दरमहा ५०० रुपये दिले जातात. एप्रिल महिना संपत आला तरी अजून लाभार्थी महिलांना मार्च महिन्याचे पैसे मिळालेले नाहीत. फेब्रुवारी महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात २४ मार्चला जमा करण्यात आला होता.

# खरीप हंगामासाठी स्मार्ट नियोजनावर भर

## आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत आढावा बैठक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील तालुका कृषी विभागातर्फे २७ एप्रिल रोजी खरीप हंगामाच्या नियोजनपूर्व आढावा बैठक घेण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात झालेल्या या बैठकीत आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप निकम, बाजार समितीचे उपसभापती सुरेश पाटील तसेच सामाजिक कार्यकर्ते विक्रांत पाटील उपस्थित होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत ठाकरे यांनी स्मार्ट व प्रभावी खरीप नियोजनावर सादरीकरण करताना शेतकऱ्यांना वेळेवर सेवा व संसाधने उपलब्ध करून देणे, उत्पादनवाढीसाठी उपाययोजना करणे तसेच शेतीमालाचा खर्च कमी करून नफा वाढविण्यावर भर दिला. आमदार पाटील यांनी मार्गदर्शन करताना उच्च दर्जाचे बियाणे वेळेवर उपलब्ध करून त्याचे योग्य वितरण करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. तसेच खत व कीडनाशकांची मुबलक उपलब्धता, जलस्रोतांचा आढावा घेऊन ड्रिप, स्प्रिंकलर व ठिबक सिंचनाद्वारे जलसंधारणाला प्राधान्य देणे, हवामानानुसार पिकांची निवड करणे व शेतकरी मेळावे आयोजित करण्याचे निर्देश दिले. खरीप हंगामातील पिकांसाठी फेरोमेन ट्रॅप व सापळा पिके याबाबतही चर्चा झाली. शासकीय योजनांचा प्रभावी प्रचार-प्रसार करून अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, यासाठी डिजिटल नोंदणी वाढविणे, पीएमएफएमई, पीएम किसान व पोखरा योजनांबाबत जनजागृती करणे तसेच शेतकऱ्यांच्या समस्या त्वरित सोडविण्यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमास तालुक्यातील शेतकरी, कृषी ताई, कृषी सखी तसेच कृषी विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी अधिकारी अविनाश खैरनार यांनी सूत्रसंचालन केले.



*अमळनेर : येथील तालुका कृषी विभागातर्फे आयोजित खरीप हंगामाच्या नियोजनपूर्व आढावा बैठकीस उपस्थित आमदार अनिलदादा पाटील, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप निकम, बाजार समितीचे उपसभापती सुरेश पाटील तसेच सामाजिक कार्यकर्ते विक्रांत पाटील आदी.*

# विहिरीची खोदाई करताना क्रेन उलटून चालकाचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील आंचलवाडी-जवखेडा शेतशिवारात विहिरीची खोदाई सुरू असताना झालेल्या अपघातात क्रेनचालक नारायणलाल गुर्जर राजूलाल (वय ३२, रा. भेरूखेडा, जि. भिलवाडा, राजस्थान) याचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी सकाळी आठच्या सुमारास घडली. पंडित विनायक पाटील यांच्या शेतातील कोरड्या विहिरीची खोली वाढविण्याचे काम सुरू होते. खोदाईदरम्यान निघालेली दगड-माती क्रेनच्या सहाय्याने विहिरीबाहेर काढली जात होती. यावेळी विहिरीलगत उभी असलेली क्रेन अतिरिक्त भारामुळे उलटून विहिरीत कोसळली.

दरम्यान, विहिरीत दोन कामगार मटेरिअल भरत होते. क्रेन कोसळताना त्यांनी प्रसंगावधान राखत विहिरीच्या भिंतीला चिकटून उभे राहत स्वतःचा बचाव केला. त्यामुळे ते दोघे या दुर्घटनेतून सुखरूप बचावले. या प्रकरणी महावीर गुर्जर यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात माहिती दिली. मृतदेहाचे विच्छेदन अमळनेर ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले असून, या घटनेची नोंद करण्यात आली आहे. हवालदार काशिनाथ पाटील व पोलीस शिपाई सागर साळुंके पुढील तपास करीत आहेत. मृत नारायणलाल गुर्जर याच्यामागे आई, पत्नी व दोन मुली, असा परिवार आहे. त्यांचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी राजस्थानात रवाना करण्यात आला आहे.

# अमळनेरमध्ये प्रगणकांचे प्रशिक्षण सुरू

## जनगणना २०२७ : एक हजार कर्मचाऱ्यांचा सहभाग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारत सरकारच्या जनगणना २०२७ मोहिमेंतर्गत तालुक्यातील प्रगणक (पर्यवेक्षक) तसेच राखीव कर्मचाऱ्यांसाठी मंगळवार, दि. २८ एप्रिलपासून शहरातील सायरादेवी बोहरा सेंट्रल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रशिक्षणास सुरूवात झाली. हे प्रशिक्षण २९ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणात कर्मचारी यात सहभागी झाले आहेत.

या प्रशिक्षणात एक हजार कर्मचाऱ्यांचा सहभाग असून त्यांना एक मास्टर ट्रेनर व चार फिल्ड ट्रेनर यांच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले जात आहे. जनगणना प्रक्रियेतील अचूक माहिती संकलन, डिजिटल नोंदणी, घरगुती सर्वेक्षण पद्धती तसेच शासकीय सूचनांचे पालन याबाबत प्रशिक्षण दिले जात आहे. नियुक्त सर्व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणास उपस्थिती अनिवार्य करण्यात आली असून, गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे कर्मचारी वेळेवर उपस्थित राहून प्रशिक्षण घेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी चहा व दुपारच्या जेवणाची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. प्रशिक्षण कामकाजाची पाहणीसाठी पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी भेट दिली. तसेच उपमुख्याधिकारी रवींद्र चव्हाण, संतोष केदारे, रामोळे यांच्यासह इतर अधिकारी दिवसभर प्रशिक्षणस्थळी उपस्थित राहून नियोजनावर लक्ष ठेवत होते.



*अमळनेर : सायरादेवी बोहरा सेंट्रल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित जनगणना २०२७ मोहिमेंतर्गत तालुक्यातील प्रगणकांच्या प्रशिक्षणाची पाहणी करताना पालिकेचे मुख्याधिकारी शिंदे यांच्यासह उपमुख्याधिकारी रवींद्र चव्हाण, संतोष केदारे, रामोळे आदी.*

# घेऊ की नको घेऊ? आता नो टेन्शन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सराफ बाजारात बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी सोने आणि चांदीच्या दरामध्ये घसरण होऊन संमिश्र व्यवहार होताना दिसले. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोने आणि चांदीचे दर घसरत आहेत.

आज सराफ बाजारात सोने आणि चांदीच्या दरात किंचित घसरण झाली. २४ कॅरेट सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम सुमारे एक लाख ५० हजार ९२०, तर २२ कॅरेट सोन्याचे दर एक लाख ३८ हजार ३४० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम सुमारे एक लाख १३ हजार १९० रुपये होते. चांदीच्या दरातही घट झाली असून, तिचा भाव प्रतिकिलो सुमारे दोन लाख ५९ हजार ९०० रुपयांवर पोहोचला आहे.

# बोरी नदीपात्रात विद्यापीठ राबविणार प्लास्टिकमुक्त अभियान

## ३ मेस यात्रोत्सवादरम्यान व्यापक स्वच्छता उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संतश्री सदगुरू सखाराम महाराज यात्रोत्सवानिमित्त बोरी नदीपात्र स्वच्छ व प्लास्टिकमुक्त करण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कक्षाच्या वतीने रविवार, दि. ३ मे २०२६ रोजी सकाळी ठीक सहा वाजता विशेष स्वच्छता अभियान राबविले जाणार आहे.

यात्रोत्सव कालावधीत सिंगल-यूज प्लास्टिक कॅरीबॅग, कुल्फी-आईस्क्रीमचे रॅपर्स तसेच सौंदर्य प्रसाधनांच्या प्लास्टिक आवरणांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने बोरी नदीपात्र प्रदूषित होते. या पार्श्वभूमीवर नदी परिसर स्वच्छ व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. या अभियानासाठी विद्यापीठाचे संचालक डॉ. व्ही. एम. रोकडे, नवनियुक्त संचालक डॉ. प्रवीण महाले, जळगाव जिल्हा समन्वयक डॉ. राजू गवारे, धुळे जिल्हा समन्वयक डॉ. निलेश पाटील, नंदुरबार जिल्हा समन्वयक डॉ. विशाल करपे, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा येथील प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. जी. पी. बोरसे, प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एच. डी. जाधव, सचिव प्रा. डॉ. पराग पाटील, सहसचिव डॉ. मांटे, उपप्राचार्य प्रा. अमृत अग्रवाल, धनदाई कला, वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील, पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, मारवड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंतराव देसले, सिनेट सदस्य डॉ. धीरज वैष्णव, डॉ. संदीप नेरकर, विभागीय समन्वयक डॉ. दिलीप गिऱ्हे, डॉ. प्रदीप औजेकर, किसान कला, वाणिज्य महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. काकासाहेब गायकवाड, डॉ. शशिकांत पाटील, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप राठोड, प्रा. डॉ. हेमंत पवार, डॉ. राजपूत, डॉ. महादेव तोंडे, प्रा. डॉ. सतीश पारधी, प्रा. विजयकुमार वाघमारे, प्रा. डॉ. अनिता खेडकर, डॉ. धनंजय चौधरी, डॉ. पवन पाटील, डॉ. हरेश चौधरी, डॉ. आय. एस. पाटील, डॉ. जगदीश सोनवणे, डॉ. अनिल महाले, डॉ. सी. आर. पाटील, डॉ. एस. एन. पाटील, महेश माळी, अथर्व करंजे आदी उपस्थित राहणार आहेत. तसेच अमळनेर नगर परिषदेतील कर्मचारी, प्रताप तत्त्वज्ञान केंद्राचे कर्मचारी, विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, योगा ग्रुप अमळनेरच्या महिला मोठ्या संख्येने सहभागी होऊन बोरी नदीपात्र स्वच्छ करण्यासाठी श्रमदान करणार आहेत.



या उपक्रमाच्या माध्यमातून यात्रेकरूंना स्वच्छ व प्रदूषणमुक्त वातावरणात बोरी नदीत यात्रोत्सवाचा मनमुराद आनंद घेता यावा, तसेच निसर्ग संवर्धनाचा संदेश समाजात पोहोचविण्याचा मुख्य उद्देश आहे. निसर्गप्रेमींनी या अभियानात सहभागी होऊन बोरी नदीपात्र स्वच्छतेच्या कार्यास हातभार लावावा व निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन उपक्रमाचे समन्वयक व राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती सदस्य, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय पारोळा तसेच प्रताप तत्त्वज्ञान केंद्राचे मानद संचालक प्रा. डॉ. मनीष करंजे यांनी केले आहे.

## संपादकीय

# उन्हाच्या पर्यटनालाही झळा

एप्रिल महिना संपायला आला. काही शाळांचे निकाल जाहीर झाले. आठवडाभरात इतर शाळांचे निकाल जाहीर होतील. मुलांना उन्हाळ्याच्या सुट्या लागतील आणि साधारणपणे जून महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यामध्ये पुन्हा नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होईल. भारतासारख्या संमिश्र हवामान असलेल्या देशात त्या-त्या राज्यातील भौगोलिक परिस्थितीनुसार आणि वातावरणानुसार शैक्षणिक वर्षाची रचना केली गेलेली आहे. परंतु जवळपास सत्तर ते ८० टक्के भागामध्ये मे-जून हे शाळांच्या सुटींचेच दिवस असतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळामध्ये कडक उन्हाळा असतो. गेल्या अनेक वर्षांची मे-जून महिन्यातील शाळांच्या सुटीची परंपरा ही शाळांपुरतीच मर्यादित राहिलेली नाही. तर ती एक सामाजिक स्तरावरची वेगवेगळ्या पद्धतीने सुटी घालवण्याचाही एक भाग होऊन गेला आहे. याच काळामध्ये थंड हवेच्या ठिकाणी फेरफटका मारायला किंवा पर्यटनाला जाणाऱ्यांची संख्या मोठी असते. महाराष्ट्रासारख्या राज्याचा विचार केला तर ६० ते ७० टक्के लोक हे मे महिन्याच्या सुटीत आपापल्या नातेवाईकांकडे दाखल होत असतात. विशेषतः शहरात राहणारी मंडळी या काळात हमखासपणे ग्रामीण भागात किंवा आपल्या आजी-आजोबांकडे, मामा-मामीकडे जाऊन सुटीचा आनंद घेतात. अनेक घरांमध्ये हा मे महिन्याच्या सुटीचा परिपाठच मानला जातो. मे महिन्याची सुटी म्हणजे पै-पाहुणे येण्याचाच कालावधी. यानिमित्ताने का होईना, परंतु काही काळासाठी नातेवाईकांनी एकत्र येण्याचे निमित्तही साधले जाते. बदलत्या काळानुसार हल्ली कोणी कोणाकडे फारसे जात नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु आजी-आजोबा, मामा-मामी किंवा ज्याला आजोळ म्हणता येईल त्याच्याशी असलेली नाळ अजून बऱ्याच ठिकाणी घट्ट आहे. सामाजिक स्तरावर कितीही बदल झाले, उलाढाल झाली तरी कुटुंब व्यवस्थेतला हा एक महत्त्वपूर्ण पैलू ठरतो. परराज्यातून मुंबईत आलेले अनेक लोक या कालावधीत आपापल्या मूळ गावी जाऊन राहतात. उत्तर प्रदेश, बिहार किंवा दक्षिणेतील राज्यांमधील लोकही काही काळासाठी आपापल्या गावी जात असतात.

यावर्षी मात्र उन्हाळ्याने आपला वेगळाच अवतार दाखवायला सुरूवात केली आहे. देशाच्या जवळपास सगळ्याच भागामध्ये चाळीस ते पंचेचाळीस डिग्री सेल्सिअसच्यावर तापमान आहे. वेधशाळांनी ते वाढण्याची शक्यता व्यक्त केली आहे. याशिवाय युद्धजन्य परिस्थितीचा चित्रविचित्र परिणाम जाणवतो आहे. विशेष म्हणजे यावेळच्या उन्हाळ्यात उष्ण वाऱ्यांबरोबरच आर्द्र उष्ण वारेदेखील वाहण्याची शक्यता आहे. साधारणपणे गेल्या आठ दिवसांपासून उन्हाचा वाढता कडाका अनेक गावांमध्ये, शहरांमध्ये पाणीटंचाईचे संकट घेऊन आला आहे. खरे तर गेल्यावर्षी भरपूर पाऊस झाला होता. अनेक ठिकाणची धरणं तुडुंब भरली होती. परंतु उष्णतेचे प्रमाण अचानक वाढल्याने बाष्पीभवनामुळे बऱ्याच धरणांमधला साठा हा अगदी ३०-३५ टक्क्यांवर येऊन पोहोचला आहे. अजून पूर्ण मे महिना बाकी आहे. साधारणपणे धरणे किंवा जलाशयांमधले पाण्याच्या साठ्यांचे नियोजन करताना जूनअखेरपर्यंत हे पाणी पुरवण्याचा प्रयत्न असतो. मात्र यंदा जूनपूर्वीच अनेक ठिकाणची धरणे कोरडी पडण्याची भीती व्यक्त होत आहे. आज महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात रोज पाणीपुरवठा होत नाही आणि साठवलेले पाणी मोजून मापून वापरण्याची अनेक ठिकाणी वेळ येते आहे. स्वाभाविकपणे यावेळच्या उन्हाळ्याने अनेक शहरांमध्ये, गावांमध्ये दुपारच्या काळात अघोषित संचारबंदीच पाहायला मिळते. काही खेड्यांमध्ये तर दुपारच्या काळात शेतांमध्येही काम करणे शक्य होत नाही. बऱ्याच ठिकाणी कांदा किंवा तत्सम पिकांची काढणी ही रात्री लाईट लावून थंड वेळांमध्ये करून घेण्याची वेळ आलेली आहे. कारण या कडक उन्हात मजूर येण्यासाठी तयार होत नाहीत. या सगळ्या बदलत्या परिस्थितीचा वेगवेगळ्या स्वरूपात परिणाम दिसू लागला आहे. प्रकृती किंवा आरोग्य सांभाळणे हे अधिक महत्त्वाचे असल्याने यंदाच्या या उन्हाळ्याच्या झळा पर्यटनावरही परिणाम करताना दिसतात. मे महिन्यातले आजोळी किंवा थंड हवेच्या ठिकाणी जाण्याचे बेत अनेकांना रद्द करावे लागत आहेत.

शासकीय पातळीवर यावर्षीच्या उन्हाळ्याची गांभीयनि दखल घेतली गेलेली आहे. आतापर्यंत दिल्या गेलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये गरज असेल तर दुपारच्या वेळी बाहेर पडताना उन्हापासून स्वतःचा बचाव करण्याचे आणि दर तासा-दीड तासाने पाणी पित राहण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. महाराष्ट्राच्या अनेक भागांत पाण्याची आणि चाऱ्याचीही टंचाई निर्माण होऊ लागली आहे. अगदी ज्या ठिकाणी आतापर्यंत कधीही टँकरने पाणी मागवावे लागले नाही तिथेदेखील टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो आहे. ज्या नाशिकच्या कुंभमेळ्याचे कोडकौतुक सुरू आहे. परंतु त्याच नाशिकमध्ये आतापासूनच पाणीटंचाईला सुरुवात झालेली आहे. ज्या नाशिक जिल्ह्यात राज्यातल्या सर्वाधिक नद्या आहेत, तिथे जर ही परिस्थिती असेल तर राज्याच्या इतर भागातील परिस्थिती काय असेल याचा सहज अंदाज येतो. थोडक्यात सांगायचे तर यंदाचा उन्हाळा हे नेहमीपेक्षा थोडा वेगळा आहे. आणि अनेक दैनंदिन व्यवहारांवर किंवा कार्यक्रमांना त्याच्या झळा पोहोचू लागल्या आहेत. परिस्थितीचा अंदाज घेऊन समजून उमजून प्रवास करणे हे तर गरजेचे ठरतेच. शिवाय प्रकृतीबरोबरच पाणी टंचाईची जाणीव ठेवणे तितकेच आवश्यक ठरते आहे. दरवर्षीपेक्षा जवळपास दहा ते पंधरा टयांनी गाड्यांची गर्दी कमी झालेली दिसते. इंधनाचे दर वाढल्याने खासगी बसेस आणि हवाई प्रवास महागलेला आहे. खूप लांबचा प्रवास करून पर्यटनाला जाणे बहुतांश लोक टाळताना दिसतात. दोन-चार दिवसांसाठी आणि जवळपासच्या ठिकाणी फेरफटका मारण्यावर लोकांचा भर आहे.

----

# दमदार फलंदाज आणि यशस्वी कर्णधार




**जन्मदिन विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटविश्वातील एक दमदार फलंदाज आणि यशस्वी कर्णधार म्हणून ओळखले जाणारे रोहित शर्मा यांचा जन्मदिन क्रिकेटप्रेमींसाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असतो. आपल्या अप्रतिम फलंदाजीने आणि शांत नेतृत्वगुणांनी त्यांनी भारतीय क्रिकेटला नवी दिशा दिली आहे.

**सुरुवातीचा प्रवास**

रोहित शर्मा यांचा जन्म ३० एप्रिल १९८७ रोजी नागपूर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना क्रिकेटची आवड होती. मर्यादित साधनसामग्री असूनही त्यांनी कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर आपल्या खेळाला धार दिली. त्यांच्या प्रतिभेची दखल घेत त्यांना लवकरच स्थानिक आणि नंतर राष्ट्रीय स्तरावर संधी मिळाली.

**आंतरराष्ट्रीय कारकीर्द आणि विक्रम**

रोहित शर्मा यांनी २००७ मध्ये भारतीय संघाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. सुरूवातीला मधल्या फळीत खेळणाऱ्या रोहित यांनी नंतर सलामीवीर म्हणून जबरदस्त कामगिरी केली. त्यांच्या नावावर एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन द्विशतके आहेत, ज्यामध्ये २६४ धावांचा विक्रम विशेष उल्लेखनीय आहे. हा विक्रम क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या मानला जातो. त्यांनी क्रिकेट विश्वचषक स्पर्धांमध्येही उत्कृष्ट कामगिरी करत अनेक शतके झळकावली आहेत.

**नेतृत्वगुण आणि कर्णधारपद**

रोहित शर्मा यांचे नेतृत्वही तितकेच प्रभावी आहे. त्यांनी मुंबई इंडियन्स संघाचे नेतृत्व करत अनेक वेळा इंडियन प्रीमियर लीग चे विजेतेपद पटकावले आहे. त्यांच्या शांत स्वभावामुळे आणि अचूक निर्णयक्षमतेमुळे ते एक यशस्वी कर्णधार म्हणून ओळखले जातात.

**फलंदाजीची शैली**

रोहित शर्मा यांची फलंदाजी शैली अत्यंत आकर्षक आणि तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण आहे. त्यांच्या टाइमिंग, फटकेबाजी आणि संयम यामुळे ते जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक मानले जातात. त्यांना 'हिटमॅन' या टोपणनावानेही ओळखले जाते. जे त्यांच्या आक्रमक खेळशैलीचे प्रतीक आहे. रोहित शर्मा यांचा जन्मदिन हा त्यांच्या यशस्वी कारकीर्दीचा आणि प्रेरणादायी प्रवासाचा उत्सव आहे. त्यांनी आपल्या मेहनतीने आणि आत्मविश्वासाने अनेक तरुणांना प्रेरणा दिली आहे. भारतीय क्रिकेटच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.




*अमळनेर : विजयनाना पाटील आर्मी स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये नवलभाऊ प्रतिष्ठान, रुख्मिणीताई प्रतिष्ठान (मुंबई), संजय एज्युकेशन सोसायटी व ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (फेब्रुवारी २०२६) उत्तीर्ण शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यास उपस्थित सीटीईटी उत्तीर्ण सन्मानीत शिक्षक, शिक्षिका.*

# शिक्षक हेच देशाचे खरे आधारस्तंभ : प्रा. डॉ. माळी

## अमळनेरमध्ये 'सीटीईटी' उत्तीर्ण शिक्षकांचा सन्मान सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षक हेच देशाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यात काही शिक्षकांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत (सीटीईटी) उत्तीर्ण होऊन या स्तंभाला अधिक बळकटी देण्याचे काम केले आहे. विद्यार्थ्यांप्रती त्यांची जबाबदारी अधिक वाढली आहे, असे मत येथील खानदेश शिक्षण मंडळाचे माजी चिटणीस तथा निवृत्त उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. ओ. माळी यांनी व्यक्त केले.

येथील विजयनाना पाटील आर्मी स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये नवलभाऊ प्रतिष्ठान, रुख्मिणीताई प्रतिष्ठान (मुंबई), संजय एज्युकेशन सोसायटी व ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (फेब्रुवारी २०२६) उत्तीर्ण शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. साने गुरुजी विद्यालयाचे निवृत्त मुख्याध्यापक एस. डी. देशमुख, नवलभाऊ प्रतिष्ठानचे मानद शिक्षण संचालक प्रा. सुनील गरुड, प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रा. श्याम पवार, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. शेख, आर्मी स्कूलचे निवृत्त प्रभारी कमांडंट सुभेदार मेजर नागराज पाटील, आर्मी स्कूलचे प्राचार्य बी. डी. पाटील, संस्थेचे ज्येष्ठ मुख्याध्यापक पी. एम. कोळी, मुख्याध्यापक सुनील पाटील, मुख्याध्यापिका कल्पना महंत, मुख्याध्यापक एच. एस. पाटील, मुख्याध्यापक उद्धवराव पाटील आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. श्याम पवार, एस. डी. देशमुख यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. अतुल लोहार यांनी मनोगत व्यक्त केले. सुरूवातीला ज्येष्ठ क्रीडाशिक्षक स्व. बी. पी. पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सेवानिवृतीच्या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापक उद्धवराव पाटील, एस. डी. पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थाध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, कार्याध्यक्ष अनिकेत पाटील, मार्गदर्शिका सौ. शीलाताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. प्रा. सुनील गरुड यांनी प्रास्ताविक केले. उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले. संजय पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### या शिक्षकांचा सन्मान

या सन्मान सोहळ्यात संस्थेतील १२ शिक्षकांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व शाल देऊन गौरव करण्यात आला. त्यात देविदास धर्मा घोडेस्वार, संतोष भास्करराव पवार, शरद भिका पाटील, उमेश प्रतापराव काटे, अनिल अशोक वानखेडे (सर्व (सहाय्यक शिक्षक- विजयनाना पाटील आर्मी स्कूल, अमळनेर), गजानन लक्ष्मण पाटील, अतुल सुधाकर लोहार, सौ. मोनालीताई नानाभाऊ सूर्यवंशी (सर्व सहाय्यक शिक्षक - सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, पिंपळकोठे, ता. एरंडोल), विशाल श्रीराम लांबोडे (सहाय्यक शिक्षक- सरस्वती माध्यमिक विद्यालय, सडावण, ता. अमळनेर), समाधान नगीनदास कोळी (सहाय्यक शिक्षक - ज्ञानप्रबोधिनी माध्यमिक विद्यालय, रोटवद, ता. धरणगाव), विकास पदमर ( सहाय्यक शिक्षक - संत मीरा माध्यमिक विद्यालय, छत्रपती संभाजीनगर), श्रीमती विजया युवराज पाटील (सहाय्यक शिक्षिका- पंडित नेहरू सहकारी शेती विद्यालय, नवलनगर.)

# तहसीलदारांच्या नावाने मागितली लाच

## दोघे धुळे 'एसीबी'च्या ताब्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील तहसीलदारांच्या नावाने लाच मागणाऱ्या रामराव हरचंद पाटील (वय ६५, रा. लोणपंचम, ता. अमळनेर, जि. जळगाव) आणि जितेंद्र राजेंद्र पाटील (वय २६, रा. झाडी, ता. अमळनेर) यांना मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी धुळ्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने सापळा रचून पकडले होते. मात्र, रात्री उशिरा ही कारवाई झाल्याने त्यांना येथील पोलीस ठाण्यातील कोठडीतच ठेवण्यात आले होते. दरम्यान, बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी सकाळी संबंधित पथकाने दोन्ही संशयितांना धुळ्याला नेल्याचे सांगितले जात आहे.

तक्रारदार हे गौण खनिज वाहतूक व्यवसायिक असून त्यांच्या दोन ट्रॅक्टरद्वारे नदीपात्रातून वाळू वाहतूक केली जात होती. ही वाहतूक सुरू ठेवण्यासाठी संशयित आरोपींनी तहसीलदारांच्या नावाने प्रत्येकी ट्रॅक्टरमागे २५ हजार रुपये, अशा एकूण ५० हजार रुपयांची लाच मागितली होती.

**सापळा रचून दोघांना पकडले**

तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे तक्रार दाखल केली. त्यावरून येथील पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येऊन संबंधितांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर 'एसीबी'ने सापळा रचून कारवाई केली. कारवाईदरम्यान आरोपींनी ५० हजार रुपयांची मागणी केली असता त्यापैकी २५ हजार रुपये जितेंद्र पाटील यांनी स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

**यांचा होता पथकात समावेश**

या कारवाईत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथील पोलीस उपअधीक्षक सचिन सांडुगे यांच्या पर्यवेक्षणाखाली पोलीस निरीक्षक पवनावळे यांनी सापळा अधिकारी म्हणून, तर पोलीस निरीक्षक यशवंत बोरे यांनी तपास अधिकारी म्हणून काम पाहिले. तसेच सापळा पथकात हवालदार राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रवीण मोरे, मकरंद पाटील, प्रवीण पाटील, सागर शिंदे, प्रीतेश चौधरी, चंद्रकांत सैंदाणे, रेश्मा परदेशी, सुधीर मोरे आणि जगदीश बडगुजर यांनी सहभाग घेतला.

# पगार होताच डीमार्टमध्ये खरेदीला जाताय?

## थांबा! या दिवसांमध्ये खरेदी केल्यास नुकसान

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सर्वसामान्य माणसे अनेकदा खरेदी करण्यासाठी स्वस्त आणि मस्त असलेल्या डीमार्टमध्ये जाण्याचा पर्याय निवडतात. पण तुम्हाला माहिती आहे का महिन्यातील काही दिवस असे असतात जेव्हा फार काही ऑफर नसतात. पण असेही काही दिवस असतात जेव्हा खूप चांगल्या ऑफर असल्याचे पाहायला मिळते. कमी किमतीत दर्जेदार वस्तू मिळवण्यासाठी ग्राहकांची पहिली पसंती म्हणजे 'डीमार्ट.' इतर मॉल्स किंवा दुकानांच्या तुलनेत डीमार्टमध्ये वर्षभर सवलती मिळतातच, पण काही ठराविक काळात येथे मोठा सेल असतो, जिथे वस्तू चक्क ५० ते ७० टक्क्यांपर्यंत स्वस्त मिळतात. काही दिवस तर असे असतात जेव्हा खरेदी करणे तोट्याचे ठरते. तुम्हालाही डीमार्टमधून स्वस्त खरेदी करायची असेल, तर खालील माहिती तुमच्या खूप कामाची ठरेल.

डीमार्टमध्ये ठराविक तारखांपेक्षा ठराविक वस्तूंवर नेहमीच सेल सुरू असतो. 'बाय वन गेट वन फ्री' ही त्यांची सर्वात लोकप्रिय ऑफर आहे. विशेषतः बिस्किटे, स्नॅक्स, साबण, शॅम्पू आणि घरगुती स्वच्छतेच्या वस्तूंवर या ऑफर्स वर्षभर चक्राकार पद्धतीने सुरू असतात.

अनेकांना असे वाटते, की महिन्याच्या १ ते १० तारखेला जास्त ऑफर्स असतात. मात्र, या काळात गर्दी प्रचंड असल्याने खरेदी करणे जिकिरीचे ठरते. जर तुम्हाला शांतपणे आणि चांगल्या डील्स शोधून खरेदी करायची असेल, तर महिन्याच्या मध्यात म्हणजेच १५ ते २५ तारखेच्या दरम्यान डीमार्टला भेट देणे फायदेशीर ठरते. हंगाम संपताना (उदा.- हिवाळा संपताना ब्लँकेट्स किंवा पावसाळा संपताना रेनकोट) डीमार्टमध्ये 'स्टॉक क्लिअरन्स' सेल लागतो. यावेळी वस्तू त्यांच्या मूळ किमतीपेक्षा निम्म्या किमतीत उपलब्ध असतात.

जर तुम्हाला गर्दीत जायचे नसेल, तर डीमार्ट रेडी या ॲपवरूनही तुम्ही सेलच्या किमतीत वस्तू मागवू शकता. शनिवार आणि रविवारी सेलचा जास्त फायदा घेता येत नाही कारण गर्दीमुळे अनेक चांगल्या वस्तूंचा स्टॉक लवकर संपतो. शक्य असल्यास मंगळवार किंवा बुधवारी सकाळी खरेदीला जावे.

# गॅस सिलिंडरचे आता नो टेन्शन!

## आता आली पाण्यावर चालणारी शेगडी; पाहा किंमत किती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगात सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम भारतावरही झाला आहे. भारतात एलपीजी पुरवठ्याचा तुटवडा जाणवतोय. ज्यामुळे लोक हे टेन्शनमध्ये आलेय. पण आता टेन्शन घेऊ नका. कारण पाण्यावर चालणारी शेगडी आली आहे.

स्वयंपाक करायचा म्हटला, की गॅस हा लागतोच. तो नसेल तर मग इलेक्ट्रिक शेगडीचा ऑप्शन आहे. पण याचा खर्चही असतोच. गॅस सिलिंडरच्या वाढत्या किमती सर्वसामान्यांचं टेन्शन वाढवत आहेत. पण आता टेन्शन घ्यायची गरज नाही. कारण पाण्यावर चालणारी शेगडी भारतीय मार्केटमध्ये आली आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या रिपोर्टनुसार, या मेड इन इंडिया शेगडीचं नाव 'प्लग-एंड-प्ले हायड्रेजन कुकिंग स्टोव्ह आहे.' हे घरगुतीसह व्यावसायिक वापरासाठीही डिझाइन करण्यात आलंय. विशेष म्हणजे हे चालवण्यासाठी गॅस आणि तेल नाही तर फक्त पाण्याची गरज असते.

ही अद्भुत शेगडी ग्रीनवाइज या कंपनीने विकसित केली आहे. या स्टोव्हची सर्वात मोठी खासियत म्हणचे तिची कार्यप्रणाली आहे. ही पाण्यावर चालते. याच्या आत एक खास पद्धतीचा 'प्रोटॉन एक्सचेंज मेम्ब्रेन' इलेक्ट्रोलायजर लावलेला असतो. ही टेक्निक वीजेच्या




मदतीने पाण्याच्या अणूंना तोडते आणि थेट स्टोव्हच्या आतच हायड्रोजन गॅस तयार करते. ज्यामुळे बर्नर जळते.

ही शेगडी आपल्या किचनमधील नॉर्मल स्टेनलेस स्टील स्टोव्हसारखी टेबल-टॉप यूनिट आहे. या स्टोव्हवर सतत ६ तास जेवण तयार करण्यासाठी फक्त २०० मिलिलीटर डिस्टिल्ड किंवा आरओ पाण्याची गरज असते. या व्यतिरिक्त हे चालवण्यासाठी फक्त १ युनिट वीज खर्च होते. म्हणजेच मोठे सिलिंडर उचलण्याचे टेन्शन नाही आणि वारंवार रिफिलिंगचीह टेन्शन नाही.

विशेषज्ञ म्हणतात की, हा स्टोव्ह 'शून्य उत्सर्जन' च्या सिद्धांतावर काम करतो. म्हणजेच जेवण तयार करताना यातून विषारी कार्बन मोनोक्साइड गॅस निघत नाही आणि कोणत्याही प्रकारचा धूरही निघत नाही. जेवण तयार झाल्यानंतर अवशेषच्या रुपात फक्त वॉटर वेबर म्हणजेच जलवाष्प निघते. ज्यामुळे हे पूर्णपणे इको-फ्रेंडली ठरते. हा स्टोव्ह कॅटेलिटिक हायड्रोजन बर्नरच्या टेक्नॉलॉजीचा वापर करते. जे नियंत्रित आणि सुरक्षित पद्धतीने निर्माण करते. यात दोन बर्नरल दिले आहेत. ज्यांना मॅन्युअल पद्धतीने जाळले जाते. हे कोणत्याही आवाज किंवा कंपनशिवाय अगदी शांत पद्धतीने काम करते. हे लहान आणि बंद किचनमधयेही कोणत्याही व्हेंटिलेशनची चिंता न करता सहज वापरलं जाऊ शकतं.

### या स्टोव्हची किंमत किती?

दोन बर्नरच्या स्टोव्हची किंमत १,५०,००० रुपये आहे. तर एका बर्नरचे रेट १०५००० रुपये आहे. रेट जास्त असल्यामुळे सध्या ते सामान्य घरांऐवजी मोठ्या व्यावसायिक किचन, कम्युनिटी किचन, सरकारी परियोजना आणि इंडस्ट्रीयल कँटिनसाठी जास्त उपयुक्त मानले जाते. कंपनीचा मुख्य फोकस याला पायलट प्रोजेक्ट म्हणून मोठ्या संस्थांमध्ये स्थापित करणे आहे.किंमत जास्त असल्यामुळे सध्या हा स्टोव्ह घरातील किचनपर्यंत पोहोचू शकेलले नाही. मात्र भविष्यात ऊर्जा सुरक्षेसाठी हे खुप महत्त्वाच पाऊल आहे. जसजसा टेक्नॉलॉजीचा विस्तार होत आहे. याची किंमत आणखी कमी होईल.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# थोर आधुनिक संत, कवी आणि समाजसुधारक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी विदर्भातील यावली (जि. अमरावती) येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यावर संत साहित्याचा आणि अध्यात्माचा प्रभाव होता. त्यांच्या वाणीतील प्रभावीपणा, कीर्तनाची शैली आणि समाजजागृतीची तळमळ यामुळे ते लवकरच लोकांच्या मनात घर करून गेले.

### समाजप्रबोधनाचा ध्यास

तुकडोजी महाराज यांनी केवळ आध्यात्मिक उपदेश केला नाही, तर समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान आणि अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्यांनी कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून लोकांना स्वच्छता, शिक्षण, व्यसनमुक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ ग्रामगीता हे ग्रामीण विकासाचे मार्गदर्शन करणारे एक महत्त्वाचे साहित्य आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी आदर्श गावाची संकल्पना मांडली आहे.

### स्वातंत्र्य चळवळीत सहभाग

तुकडोजी महाराज यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळ मध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी आपल्या कीर्तनातून देशभक्तीची भावना जागवली आणि लोकांना स्वातंत्र्य संग्रामात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात राष्ट्रीय चेतना निर्माण झाली.

### ग्रामीण विकास आणि मानवता

तुकडोजी महाराज यांनी ग्रामविकासावर विशेष भर दिला. त्यांनी स्वावलंबी, स्वच्छ आणि सुसंस्कृत गावांचे स्वप्न पाहिले. त्यांच्या विचारांमध्ये मानवतेला सर्वोच्च स्थान होते. त्यांनी सर्व धर्मांमध्ये एकता आणि बंधुभाव वाढवण्याचा संदेश दिला.


### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या आधुनिक युगातही तुकडोजी महाराज यांचे विचार अत्यंत समर्पक आणि मार्गदर्शक आहेत. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान, ग्रामविकास आणि सामाजिक एकता यांसारख्या विषयांवर त्यांचे विचार आजही तितकेच उपयुक्त आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्मदिन हा केवळ एक स्मरणदिन नसून त्यांच्या विचारांना आत्मसात करण्याचा दिवस आहे. त्यांनी दिलेल्या शिकवणीमुळे समाज अधिक सुसंस्कृत, सुसंघटित आणि प्रगत होऊ शकतो. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजसेवेचा मार्ग स्वीकारला, तर तीच त्यांच्या जन्मदिनानिमित्त खरी आदरांजली ठरेल.

# सुरांचे साधक : श्रीनिवास खळे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष



श्रीनिवास खळे यांचा जन्म ३० एप्रिल १९२६ रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना संगीताची आवड होती. त्यांनी शास्त्रीय संगीताचा अभ्यास केला आणि त्यातूनच त्यांच्या संगीतकारकीर्दीचा पाया मजबूत झाला. त्यांच्या सुरांमध्ये भारतीय परंपरेची गोडी आणि आधुनिकतेचा स्पर्श यांचा सुंदर संगम दिसतो.

### भावगीतांना दिलेली नवी ओळख

श्रीनिवास खळे यांनी मराठी भावगीतांना एक नवे रूप दिले. त्यांच्या रचनांमध्ये साधेपणा, माधुर्य आणि भावनांची गहिरी अभिव्यक्ती दिसून येते. त्यांनी अनेक कवींच्या कवितांना सुरांची साथ देऊन त्या अधिक लोकप्रिय केल्या. त्यांच्या संगीतबद्ध गाण्यांमध्ये शुक्रतारा मंद वारा आणि गगन सदन तेजोमय यांसारखी अजरामर गीते आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत.

### विविधतेने नटलेले संगीत

खळे यांनी केवळ भावगीतांपुरते मर्यादित न राहता भक्तिसंगीत, चित्रपटसंगीत आणि नाट्यसंगीत क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या संगीतामध्ये शब्दांना न्याय देणारी चाल आणि श्रोत्यांच्या मनाला भिडणारी धून हे वैशिष्ट्य ठळकपणे दिसते. त्यांनी अनेक नामवंत गायक-गायिकांसोबत काम केले आणि त्यांच्या आवाजातून आपल्या रचनांना अधिक खुलवले.

### साधेपणा आणि संगीतनिष्ठा

श्रीनिवास खळे यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे आणि नम्र होते. त्यांनी प्रसिद्धीपेक्षा कलेला अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रत्येक रचनेत त्यांनी पूर्ण प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केले. त्यामुळेच त्यांचे संगीत आजही तितकेच ताजे आणि प्रभावी वाटते.

### संगीतविश्वावर अमिट ठसा

मराठी संगीतविश्वात खळे यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या रचनांनी अनेक पिढ्यांना समृद्ध केले आहे. त्यांच्या संगीतामुळे मराठी भाषेतील कवितांना एक नवीन जीवन मिळाले. श्रीनिवास खळे यांचा जन्मदिन हा त्यांच्या सुरेल वारशाचे स्मरण करण्याचा आणि त्यातून प्रेरणा घेण्याचा दिवस आहे. त्यांच्या संगीताने मनाला दिलासा, आनंद आणि चिंतनाची दिशा दिली आहे. आजच्या पिढीने त्यांच्या रचनांमधील साधेपणा, संवेदनशीलता आणि संगीतनिष्ठा आत्मसात केली.

# भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक, एक दूरदर्शी व्यक्तिमत्त्व दादासाहेब फाळके

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

दादासाहेब फाळके यांचे पूर्ण नाव धुंडीराज गोविंद फाळके असे होते. त्यांचा जन्म ३० एप्रिल १८७० रोजी झाला. लहानपणापासूनच त्यांना कला, चित्रकला आणि छायाचित्रण यांची आवड होती. त्यांनी विविध कलाप्रकारांचे शिक्षण घेतले आणि त्यातूनच पुढे चित्रपट निर्मितीचा विचार त्यांच्या मनात रुजला.



### भारतीय चित्रपटसृष्टीची पायाभरणी

१९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी भारतातील पहिला मूक चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' तयार केला. हा चित्रपट केवळ एक कलाकृती नव्हता, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील एक क्रांतिकारी टप्पा होता. त्या काळात तांत्रिक साधनांची कमतरता असूनही त्यांनी अतिशय जिद्दीने आणि मेहनतीने हा चित्रपट पूर्ण केला.

या चित्रपटामुळे भारतीय प्रेक्षकांना आपल्या संस्कृतीशी संबंधित कथा पडद्यावर पाहण्याची संधी मिळाली. त्यामुळे भारतीय चित्रपटसृष्टीला एक स्वतंत्र ओळख मिळू लागली.

### संघर्ष आणि यशाचा प्रवास

दादासाहेब फाळके यांचा प्रवास सोपा नव्हता. आर्थिक अडचणी, तांत्रिक अडथळे आणि समाजातील शंका-कुशंका यांचा सामना करत त्यांनी आपले ध्येय साध्य केले. त्यांनी स्वतः कॅमेऱ्याचे काम, दिग्दर्शन, पटकथा लेखन आणि संपादन यासारख्या अनेक भूमिका पार पाडल्या. त्यांच्या चिकाटीमुळे पुढे अनेक चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक प्रेरित झाले आणि भारतीय चित्रपटसृष्टीचा विस्तार होत गेला.

### भारतीय चित्रपटावर त्यांचा प्रभाव

आज भारतातील चित्रपटसृष्टी जगातील सर्वात मोठ्या चित्रपट उद्योगांपैकी एक आहे. या यशामागे दादासाहेब फाळके यांचे योगदान अनमोल आहे. त्यांच्या स्मरणार्थ भारत सरकारकडून दरवर्षी दादासाहेब फाळके पुरस्कार दिला जातो, जो भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च सन्मान मानला जातो. दादासाहेब फाळके यांचा जन्मदिन हा केवळ एका महान व्यक्तीची आठवण करण्याचा दिवस नाही, तर भारतीय चित्रपटसृष्टीच्या उगमाची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांच्या कार्यामुळे भारतीय संस्कृतीला जागतिक स्तरावर पोहोच मिळाली. आजच्या पिढीने त्यांच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन नव्या कल्पनांना वाव द्यावा आणि भारतीय चित्रपटसृष्टीला अधिक उंचीवर नेण्याचा प्रयत्न करावा, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# गर्मी में दही खट्टा होने से बचाना है?

## अपनाएं ये आसान टिप्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गर्मी के मौसम में दही जल्दी खट्टा हो जाना एक आम समस्या है, जिससे इसका स्वाद और उपयोग दोनों प्रभावित होते हैं। दरअसल, बढ़ते तापमान के कारण किण्वन की प्रक्रिया तेज हो जाती है, जिससे दही में अम्लता बढ़ने लगती है। हालांकि, सही तापमान, उचित मात्रा में स्टार्टर और सही बर्तन का इस्तेमाल कर दही को लंबे समय तक ताजा और स्वादिष्ट रखा जा सकता है। कुछ आसान घरेलू उपाय अपनाकर गर्मियों में भी दही को हल्का, मीठा और सेहतमंद बनाए रखना संभव है।

दही मिथिला रसोई का रोजमर्रा का हिस्सा है, पर गर्मी बढ़ते ही यह जल्दी खट्टा हो जाता है। उच्च तापमान पर किण्वन तेज होने से जीवाणु अधिक सक्रिय हो जाते हैं, दूध-शर्करा जल्दी लैक्टिक-एसिड में बदलती है और अम्लता बढ़ती है। सही तरीके अपनाएं तो दही लंबे समय तक ताजा और हल्का रहता है।

मिथिलांचल में खासकर दही सबसे ज्यादा लोकप्रिय है यहां माना जाता है कि आप मैथिली लोगों को एक तरफ दही और दूसरी तरफ कई तरह के पकवान दे दें तो उनमें दही खाने की ही रुचि आपको दिखेगी।

सर्दियों में दही जमने को ८-१० घंटे लगते हैं। गर्मियों में प्रक्रिया आधी रह जाती है। दही ठीक से जमते ही तुरंत फ्रिज में रखें, ताकि प्राकृतिक किण्वन अनियंत्रित न बढ़े। रसोई के ठंडे कोने में, धूप या गैस-चूल्हे से दूर जमाना गति को नियंत्रित करता है। दही जमाने के लिए स्टार्टर जितना अधिक, किण्वन उतना तेज। गर्मियों में कम स्टार्टर-कल्चर उपयोग करें। अधिक बैक्टीरिया दही को शीघ्र खट्टा कर देते हैं। सर्दियों में मात्रा बढ़ाना उचित है, पर गर्मी में संयम रखें। मिट्टी के बर्तन अतिरिक्त नमी सोखकर दही को स्वाभाविक ठंडक देते हैं और हल्का स्वाद बनाए रखते हैं। यदि मिट्टी का बर्तन न हो, तो मोटा ऊष्मारोधी या भारी स्टील का बर्तन उपयोग करें। पतले कटोरे की तुलना में यह ताप-परिवर्तन धीमा करता है।



जमाते समय दूध बहुत गर्म हो तो दही पानी छोड़ता है और जल्दी खट्टा होता है। दूध को हल्का गुनगुना रखें, न अधिक गरम न ठंडा, ताकि बनावट स्थिर रहे। जमने के बाद देर किए बिना फ्रिज में रखें। ठंडी स्थिति अम्लता-वृद्धि को धीमा कर देती है, दही ताजा और स्वादिष्ट बना रहता है। ये छोटे समायोजन गर्मियों में भी दही को हल्का और सेहतमंद बनाए रखते हैं।

# नोकरी सोडून तरुणाने सुरू केला स्टार्टअप

## अवघ्या चार महिन्यांतच कमावले एक कोटी रुपये

सक्सेस स्टोरी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या काळात स्टार्टअप सुरू करणे सोपे मानले जात नाही. पण २४ वर्षांच्या एका तरुणाने अवघ्या ४ महिन्यांत एक कोटी रुपयांचा स्टार्टअप उभा केल्याचा दावा केला आहे. ही गोष्ट केवळ वेगाने यश मिळवण्याची नाही, तर योग्य समस्या ओळखून त्यावर तातडीने काम करण्याची आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या तरुणाच्या कहाणीने लोकांना आश्चर्यचकित आणि प्रेरितही केले आहे.

### कल्पना कशी सुचली?

२४ वर्षीय बिझनेसमन उज्ज्वल नरगोत्राने सांगितले, की ही कल्पना 'क्रिएटर इकॉनॉमी'मधील एक मोठी समस्या पाहून सुचली. कंटेंट क्रिएटर्स उत्तम व्हिडिओ आणि पोस्ट तर बनवत आहेत, पण त्यांना येणारे हजारो डीएम आणि कमेंट्स हाताळणे कठीण जात आहे. या समस्येवर त्याने काम करण्याचे ठरविले. जर ही प्रक्रिया ऑटोमेट केली, तर क्रिएटर्ससाठी मोठ्या संधी निर्माण होऊ शकतात, असे त्याला वाटले.

### ४ महिन्यांत एक कोटीपर्यंतचा प्रवास

उज्ज्वलने जास्त विचार करण्यापेक्षा वेगाने काम करण्याचा निर्णय घेतला. त्याने आपली नोकरी सोडली आणि एक बेसिक प्रोडक्ट तयार केले. त्याचे हे प्रॉडक्ट परफेक्ट नव्हते, पण युजर्संना वापरण्यायोग्य नक्कीच होते. त्याने तयार केलेले 'Link-Please' प्लॅटफॉर्म क्रिएटर्सच्या ऑडियन्स एंगेजमेंटला ऑटोमेट करण्यास मदत करते. ज्यामुळे न वाचलेले मेसेज आणि संधी शोधणे सोपे होते. हळूहळू या प्लॅटफॉर्मशी १०,००० हून अधिक क्रिएटर्स जोडले गेले आणि युजर्सच्या फिडबॅकनुसार प्रॉडक्टमध्ये सुधारणा करण्यात आली. उज्ज्वलने दावा केला, की त्याच्या कंपनीने कोणत्याही बाहेरील फंडिंगशिवाय एक कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे.

### पुढील टार्गेट काय?

आता उज्ज्वलचे पुढचे टार्गेट स्टार्टअपचे उत्पन्न एक कोटी रुपयावरून दहा कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे आहे. जर योग्य समस्या लवकर सोडविली, तर प्रगती आपोआप होते, असे त्याचे मत आहे.

### लोकांचे प्रश्न

एकीकडे लोक उज्ज्वलच्या यशाचे कौतुक करत असताना दुसरीकडे काही लोक प्रश्नही उपस्थित करत आहेत. अनेक युजर्सनी विचारले, की एक कोटी रुपयांचा हा आकडा नेमका काय आहे? हे महसूल आहे की एकूण व्हॅल्यूएशन? काहींनी 'ManyChat' आणि 'SuperBio' सारख्या प्लॅटफॉर्मशी तुलना करत यात नवीन काय आहे, असा प्रश्न विचारला.




शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# भक्ती, धर्मसंरक्षण आणि न्यायाचा दिव्य संदेश

## श्रीनृसिंह जयंती विशेष



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील विविध अवतरांपैकी भगवान विष्णूंचा नरसिंह अवतार अत्यंत विलक्षण आणि प्रभावी मानला जातो. वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्दशीला साजरी केली जाणारी श्रीनृसिंह जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून, अन्यायावर न्यायाचा विजय आणि भक्तीची पराकाष्ठा यांचे प्रतीक आहे.

हेमाद्रींत नृसिंह पुराणांत – 'वैशाख शुक्ल चतुर्दशीस प्रदोषकालीं माझें ( नृसिंहाचें ) जन्म झालें. तें पुण्यकारक, पापनाशक माझें व्रत प्रतिवर्षी करावें, तेणेंकरून माझा संतोष होतो.' दोन्ही दिवशीं प्रदोषव्याप्ती असतां किंवा अंशतः समव्याप्ती असतां परा करावी. दोन दिवशीं विषमव्याप्ती असेल तर अधिक व्याप्ती असेल ती घ्यावी. दोन्ही दिवशीं व्याप्ती नसेल तर परा घ्यावी. कारण दुसऱ्या दिवशीं गौणकालीं ( संकल्पकालीं ) व्याप्ती आहे व पूर्वदिवशीं व्याप्ती नाहीं. आतां जें 'मध्याह्नसमयीं नद्यादि स्वच्छ जलांत स्नान करून – असा उपक्रम करून सांगतो – वस्त्रधारण करून व्रतकर्मास प्रारंभ करावा' असें तेथेंच सांगितलें आहे. तें, संकल्परूप जो व्रतारंभ तद्विषयक होय. यावरून मध्याह्नव्यापिनी घ्यावी, अशा भ्रमांत पडूं नये. कारण पूर्वोक्त नृसिंह पुराणवचनाशीं विरोध येईल. आणि 'वैशाख शुक्ल चतुर्दशीस सोमवार व स्वाती नक्षत्र यांचा योग असतां प्रदोषसमयीं नृसिंहाचा अवतार झाला' असें टोडरानंदांत स्कंदपुराणवचन आहे. आणि 'कूर्म, नृसिंह, बौद्ध, कल्की हे सायंकालीं अवतीर्ण झाले' असें पूर्वी चैत्रमासीं पुराणसमुच्चयवचनही सांगितलें आहे, असें केचित् म्हणतात. खरा प्रकार म्हटला तर पूर्वींचीं वचनें मोठ्या प्रसिद्ध निबंधांत उपलब्ध नसल्यामुळें निर्मूल असल्याकारणानें आणि हेमाद्रींत नृसिंह पुराणांत – 'माझ्या जन्मानें उत्पन्न पुण्यव्रत पापनाशक आहे' असा उपक्रम करून 'स्वाती नक्षत्र, शनिवार, सिद्धयोग, वणिजकरण यांचा योग असतां तें व्रत पुरुषांना सौभाग्ययोगानें व दैवयोनानें प्राप्त होतें. या सर्व योगांनीं युक्त असें व्रत कोटिहत्या नाश करणारें होतें. यांतून एकादाही योग जरी असेल तथापि तो माझा दिवस पापनाश करणारा होय. ( केवल योगरहित ) ही दिवशीं हें उत्तम व्रत करावें, न करतील तर चंद्र, सूर्य आहेत तोंपर्यंत नरकाप्रत जातील.' – असें सांगून 'नंतर मध्याह्नीं नदी इत्यादी स्वच्छजलामध्यें स्नान करावें' इत्यादी वचनें करून मध्याह्नींच व्रत सांगितल्यावरून चतुर्दशीच्या उत्तरार्धी वणिजकरण येतें त्यावेळीं मध्याह्नीं जन्म आहे असें स्पष्ट प्रतीतीस येतें. संध्यासमयीं जन्म झालें असें तर कोणत्याही ग्रंथांत सांगितलें नसल्याकारणानें तें वचन मूर्खपणानें कोणीतरी केलेलें आहे यास्तव त्याला अनुसरून जो निर्णय तोही त्याज्यच आहे.

तशी हीच नृसिंह चतुर्दशी तिथि योगविशेषानें अतिप्रशस्त होय. तें तेथेंच सांगतो – 'स्वातीनक्षत्र, शनिवार, सिद्धयोग, वणिजकरण, यांच्या योगानें युक्त चतुर्दशी प्राप्त होईल तर तो महादैवयोग होय, कदाचित् हे पूर्वोक्त योग जरी नसले तथापि माझा जन्मदिवस पापनाशक आहे. सर्व वर्णांस माझ्या व्रताचा अधिकार आहे. माझे जे भक्त मत्परायण त्यांनीं तर अवश्य करावें,' तसेंच 'सुवर्णाचा सिंह माझ्या संतोषार्थ द्यावा.' तसेंच – 'जो मनुष्य माझा दिवस जाणून त्या दिवशीं उपोषणादि करीत नाहीं तो चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत घोर नरकार जातो.' हें व्रत संयोगपृथक्न्यायानें नित्य व काम्यही आहे. आतां या तिथीचे ठायीं विशेष विधि सांगतो. मध्याह्नीं मृत्तिका, गोमय, तिल, आंवळ्यांचा कल्क यांहीं स्नान करून

**'नृसिंह देवदेवेश तव जन्मदिने शुभे ॥ उपवासं करिष्यामि सर्वभोगविवर्जितः'**

या मंत्रानें व्रताचा संकल्प करून आचार्य वरून सायंकालीं 'पलप्रमाण ( चार तोळे ) सुवर्णाची किंवा त्याचे अर्धानें अथवा अर्धाचे अर्धानें किंवा यथाशक्ती नृसिंह व लक्ष्मी यांची मूर्ती करून स्थापन करावी.' असें सांगितलें आहे. नृसिंहमूर्ती व शक्तीप्रमाणें केलेला सुवर्णसिंह यांची कलशावर पूजा करून रात्रीं जागरण करून प्रातःकालीं पुनः पूजा करून

**'नृसिंहाच्युत देवेश लक्ष्मीकांत जगत्पते ॥**
**अनेनार्चाप्रदानेन सफलाः स्युर्मनोरथाः'**

या मंत्रानें ती मूर्ती आचार्यास द्यावी आणि

**'मद्वंशे ये नरा जाता ये जनिष्यंति चापरे ॥**
**तांस्त्वमुद्धर देवेश दुस्तराद्भवसागरात् ॥**
**पातकार्णवमग्नस्य व्याधिदुःखांबुवारिभिः तीव्रैश्च**
**परिभूतस्य महादुःखगतस्य मे ॥ करावलंबनं देहि**
**शेषशायिन् जगत्पते ॥ श्रीनृसिंह रमाकांत भक्तानां**
**भयनाशन ॥ क्षीरांबुधिनिवासिंस्त्वं चक्रपाणे**
**जनार्दन ॥ व्रतेनानेन देवेश भुक्तिमुक्तिप्रदोभव'**

या मंत्रांनीं प्रार्थना करावी. याप्रमाणें हें संक्षेपानें व्रत सांगितलें, असें समजावें.

### श्रीनृसिंह जयंती व्रत

हे व्रत वैशाख शुक्ल चतुर्दशीला करतात. ही चतुर्दशी प्रदोषव्यापिनी पाहिजे. जर दोन दिवशी अशी चतुर्दशी असेल अगर दोन्ही दिवशी नसेल तर ( मदनतिथी ) त्रयोदशीचा संसर्ग टाळण्यासाठी दुसऱ्या दिवशीचीच तिथी घ्यावी. उपवास करावा. जर सुदैवाने कधीतरी पूर्वविद्धा ( त्रयोदशीयुक्त ) तिथी शनिवार, स्वाती नक्षत्र, सिद्धियोग आणि वणिजकरण असेल तर त्याच दिवशी करावे. व्रताच्या दिवशी पहाटे सूर्याला व्रत करणार असल्याचे सांगून तांब्याच्या कलशात पाणी भराव.

**श्री नृसिंह देवदेवेश तव जन्मदिने शुभे । उपवासं करिष्यामि सर्वभोगविवर्जितः ॥**

या मंत्राने संकल्प सोडून मध्यान्ही नदीवर जाऊन तीळ, गाईचे शेण, माती आणि आवळे यांनी मर्दन करून वेगवेगळे चार वेळा स्नान करावे. नंतर पुन्हा शुद्ध स्नान करून तेथे नित्य आन्हिक करावे. नंतर घरी यावे व क्रोध, लोभ, मोह, असत्य भाषा, कुसंग व पापाचरण यांचा त्याग करावा. ब्रह्मचर्य पाळावे आणि उपवास करावा. सायंकाळी चौरंगावर अष्टदल काढून त्यावर सिंह, श्रीनृसिंह आणि लक्ष्मी माता यांच्या सुवर्णप्रतिमा प्राणप्रतिष्ठापूर्वक स्थापन करून त्यांची षोडशोपचारपूर्वक पूजा करावी. ( किंवा पौराणिक मंत्रांनी पंचोपचारांनी पूजा करावी) . रात्री गायन-वादन, पुराणश्रवण, हरिकीर्तन, जागरण करावे. दुसऱ्या दिवशी ब्राह्मण भोजन घालून परिवारासह स्वतः भोजन करावे. याप्रमाणे प्रतिवर्षी करण्याने नृसिंह-भगवान त्याचे सर्व ठिकाणी रक्षण करतात व यथेच्छ धनधान्य देतात. श्रीनृसिंह पुराणात या व्रताची कथा आहे.

हीच नरसिंह चतुर्दशी स्वाती नक्षत्र, शनिवार, सिद्धयोग, वणिजकरण याच्या योगाने युक्त चतुर्दशी असेल, तर अशा योगावर हे व्रत करणाऱ्यास सौभाग्य प्राप्त होते. जरी यातील एखादाही योग असेल तर तो दिवस पापनाशक आहे. हे व्रत जो कोणी न करील, तो सूर्यचंद्र असे तो नरकात जाईल.

### शिवलिंग पूजा

हे व्रत श्रीनृसिंह जयंतीच्या दिवशीच करतात. गव्हाच्या पिठाचे शिवलिंग करून त्याची स्थापना करतात व त्याची यथासांग पूजा करतात. काही ठिकाणी हे श्रीनृसिंह जयंतीच्या बरोबरच करतात. दोन्ही देवांची पूजा एकत्र करतात. या व्रताने मनुष्य भयापासून मुक्त होतो.

### वैशाखी व्रत

वैशाखी पौर्णिमा फार मोठी शुभ तिथी आहे. या दिवशी दानधर्मादी अनेक पुण्य कृत्ये करतात. ही जर सूर्योदयापासून दुसऱ्या दिवशी सूर्योदयापर्यंत असेल, तर अधिक प्रशस्त मानली आहे. एरवी ती कार्यानुसार घ्यावी. या दिवशी

(१) धर्मराजासाठी पाण्याने भरलेला कुंभ व मिष्टान्न दान दिल्यास गोदानाचे पुण्य मिळते.
(२) पाच अगर सात ब्राह्मणांना हलवा ( शर्करायुक्त तीळ ) दिला, तर सर्व पापांचा क्षय होतो.
(३) सारवलेल्या भूमीवर तीळ पसरून त्यावर सपुच्छ मृगाजिन शिंगासह अंथरून व उत्तम प्रकारच्या वस्त्रासह दान केल्यास महान फळ मिळते.
(४) तिळाने स्नान करून तूपसाखर आणि तिळाने भरलेला कलश भगवान विष्णूच्या नाममंत्राने आहुती द्यावी, अगर तीळ आणि मध यांचे दान करावे. तिळाच्या तेलाचे दिवे लावावेत. तिलतर्पण करावे, अगर गंगास्नान केल्याने सर्व पापांतून मुक्त होतो.
(५) जर या दिवशी एकभुक्त राहून पौर्णिमा, चंद्रमा व सत्यनारायणव्रत केले, तर सर्व प्रकारची सुखे, संपदा आणि श्रेयस यांची प्राप्ती होते.

काही ठिकाणी या पौर्णिमेस 'विनायक पौर्णिमा' असेही म्हणतात. यावेळी धर्मराजाची सुवर्ण प्रतिमा करून तिची षोडशोपचारे पूजा करतात. या दिवशी पाणी भरून मृत्तिकापात्रे दान, दिली तर सुवर्णपात्रासमान पुण्य मिळते. या दिवशी ब्राह्मणास भोजन घालावे. मिष्टान्न व तांबूल दानाने गोदान, नौकादान याचे पुण्य मिळते. यामुळे अकाली निधन व कुमृत्यूपासून रक्षण होते.



# वैशाख पौर्णिमेचे पूजन कसे कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दर पौर्णिमेला सत्यनारायण पूजा करतो. तो प्रदोष काळात करावा. (प्रदोष काळ म्हणजे सायंकाळी पाच ते सातच्या दरम्यान) पौर्णिमा ही गुरुवार, दि. ३०/०४/२०२६ या दिवशी रात्री ०९ : १३ मिनिटांनी चालू होईल आणि शुक्रवार, दि. ०१/०५/२०२६ या दिवशी रात्री १० : ५३ मिनिटांनी पौर्णिमा संपते आहे. त्यामुळे श्री सत्यनारायण पूजा ही शुक्रवार, दि. ०१/०५/२०२६ या दिवशी प्रदोष काळात करावी.

पौर्णिमा उपवास हा १ मे शुक्रवार रोजी आहे. हिंदू धर्मानुसार उगवत्या सूर्याच्या वेळेस जी तिथी असते ती ग्राह्य धरली जाते.

# त्रिपुंड्र म्हणजे काय?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

त्रिपुंड्र म्हणजे फक्त कपाळावर काढलेल्या तीन आडव्या रेषा नसून, तर साधकाला महादेवाशी एकरूप होण्याचा एक पवित्र आध्यात्मिक मार्ग मानला जातो. शास्त्रानुसार कपाळावर ओढल्या जाणाऱ्या या तीन रेषांमध्ये एकूण २७ देवतांचे अधिष्ठान असते. म्हणजेच प्रत्येक रेषेत ९ देवता वास करत असतात. पहिली रेष म्हणजे ऋग्वेद, पृथ्वी तत्त्व आणि महादेव यांचे प्रतीक असते तर दुसरी रेषा यजुर्वेद, अंतरिक्ष तत्त्व आणि महेश्वर यांचे प्रतीक मानली जाते, तर तिसरी रेष सामवेद, स्वर्गलोक आणि स्वतः भगवान शिव यांचे प्रतिनिधित्व करते. धार्मिकदृष्ट्या विशेषतः शिवपुराणात, असे सांगितले आहे, की त्रिपुंड्र धारण केल्याने मनुष्याची संचित पापे नष्ट होतात आणि त्याला शिवकृपा प्राप्त होते.

शैव आणि अघोर परंपरेनुसार, पवित्र असलेले यज्ञभस्म फक्त कपाळावरच नव्हे, तर शरीराच्या ३२ अंगांवरही लावले जाते. ज्यात मस्तक, कपाळ, दोन्ही कान, दोन्ही डोळे, नाक, मुख, कंठ, दोन्ही खांदे, दोन्ही बाहू, दोन्ही कोपरे, दोन्ही मनगटे, छाती, हृदय, नाभी,
पाठ, कंबर, दोन्ही मांड्या, दोन्ही गुडघे, दोन्ही पिंड्या, दोन्ही घोटे आणि दोन्ही पाय यांचा समावेश होतो. या ३२ अंगांवर भस्म लावण्याची पद्धत शरीराला एका चालत्या-बोलत्या मंदिराचे स्वरूप देते आणि साधकाला सतत शिवतत्त्वाची जाणीव करून देत असते.

सायंटिफिकली पहिले तर कपाळावरील आज्ञा चक्रावर यज्ञभस्म किंवा चंदनाचा लेप लावल्याने मेंदूला शांतता मिळते आणि त्यामुळे विचारांचा गोंधळ कमी होऊन मन अधिक शांत आणि एकाग्र होते. भस्माच्या या रेषा साधकाला जीवनातील इन्कॉन्स्टन्सी, वैराग्य आणि अहंकाराचा त्याग याची आठवण करून देतात. त्रिपुंड धारण करायच्या विधी आणि पद्धती पंथानुसार, भक्ती मार्गानुसार आणि साधकाच्या संकल्पानुसार बदलत राहतात. ज्यामुळे साधकाला शिवाची कृपा प्राप्त तर होतेच, पण त्याचबरोबर संरक्षणसुद्धा मिळते. जेव्हा साधक हे भस्म श्रद्धेने अंगावर धारण करतो ना, तेव्हा त्याचा आध्यात्मिक प्रवास हळूहळू संसारातून आत्मज्ञानाकडे, म्हणजेच शून्याकडून अनंताकडे सुरू होतो.

# उठी उठी नरसिंहा...!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यात तसेच तेलंगाणा, कर्नाटक, आंध्र प्रदेशातील बऱ्याच भाविकांचे कुलदैवत श्रीलक्ष्मीनृसिंह आहे. नांदेड जिल्ह्यात राहेर, शेळगाव, शंखतीर्थ, विष्णुपुरी, कवठा तसेच नांदेड शहरातील होळी या भागात नरसिंहाची प्रसिद्ध अशी मंदिरे आहेत. नरसिंह ही देवता भक्तांच्या कुळाची देवता आहे. प्रत्येक संतांनी नरसिंह या देवतेचे भक्तीमार्गातील महत्त्व विशद केले आहे. त्याचप्रमाणे आधुनिक महिपती संतकवी दासगणू महाराजांच्या प्रत्येक रचनेत सुद्धा आपण सर्वांनी वाचले असेल. त्यात त्यांचे सर्वात आवडते नाव म्हणजे नरहरी असे. आणि त्यांचे सर्वांत प्रसिद्धी पद 'राहेर क्षेत्र' हे तर प्रत्येकाला सहजपणे समजेल असे सोपे आणि भक्तीमय पद आहे अणि प. पू. दासगणू महाराज यांनी नरहरी अवतार नावाचे तीर्तनोपयोगी अख्यान केले आहे. तसेच गोरठ्यास कीर्तन मंडपात उग्र नरसिंहाचा फोटो मनाचे चित्त वेध असतो. प्रत्येक वेळेस तेथे गेल्यानंतर ते चित्र आपल्यापैकी बऱ्याच जणांनी पाहिलेही असेल. असेच एक पद भगवान नरसिंहावर प. पू. आप्पांनी (पू. स्वामी वरदानंद भारती) यांनी रचले आहे. ते पद राष्ट्रभक्तीच्या रसाने ओतप्रोत असेच आहे. पू. स्वामी वरदानंद भारती यांचे (आप्पा) साहित्य, कीर्तन, प्रवचन, व्याख्याने हे राष्ट्रभक्तीचे ज्वलंत असे अधिष्ठान आहे. गोरठ्यास ही दैनंदिन आरती व उपासना झाल्यानंतर भारत मात की जयचा घोष होतो. प. पू. स्वामी वरदानंद भारती (आप्पा) शके १९२० म्हणजे (इ.स १९९८ ) या वर्षात गोरठा येथे होतो. त्यावेळेस पू. आप्पांनी गोरठ्याच्या भोवताली बराच प्रवास केला. याच काळात देगलूर तालुक्यातील शेळगाव येथे नरसिंहाचे दर्शन घेतले ते घेत असताना तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीमुळे अंतःकरणाला होणारी व्यथा काव्याच्या स्वरूपात व्यक्त केली. भगवंताचे दर्शन घेऊन गाभाऱ्याबाहेर आल्यानंतर पू. आप्पांनी वै. श्री छगनकाकांना ते स्फुरलेले पद लिहिण्यास सांगितले. ते काव्य वा पद सांगण्याचा आवेग खूप प्रचंड होता. हळू सांगा, असे म्हणायची तर सोयच नाही. त्यामुळे वै. श्री छगनकाका यांना लिहिणे अवघड जाऊ लागेल अथवा लिहिता येईना प. पू. आप्पांचा भावावेश तसा होता. ते काव्य पुढीलप्रमाणे-


**उठी उठी नरसिंहा, आता प्रकटो तव गर्जना।**
**हिरण्यकशिपू फार मातले, कर त्यांच्या कंदना ।।**
**दीप्त तेज प्रगटू, भयानक कराल दंष्ट्रतुनी ।**
**उग्र नखांना तुझ्या येऊ, दे तीक्ष्ण धार परतुनी ।।**
**राष्ट्रपुरातन जना, फसवुनी नेत्यांनी खंडिले ।**
**उरलेले या भ्रष्टांनी, विकावया काढिले ।।**

हे पद वाचताना देशप्रेमाची उत्कटता कशी व देशबांधवांबद्दलची तळमळ कशी असावी हे लक्षात येते. पू. आप्पा नरसिंहास आवाहन करताना असे म्हणतात भगवंता! एक भक्त प्रल्हदा उद्धरवा आणि तुझी उग्रता तीक्ष्णता मावळी का. या भारतमातेची स्थिती किती दारुण झाली याची तुला क्षिती वाटत नाही का? तुझ्या त्या त्रिखंडाला थरारून टाकणाऱ्या गगनभेदी गर्जनेची, तुझ्या कराल दाढांनी मातलेल्या हिरण्यकश्यपुंच्या नरडीचा घोट घेण्याची आणि तुझ्या तीक्ष्ण अशा नखांनी त्याचे पोट विदारन करण्याची गरज आहे. तरी तू लवकरात लवकर प्रगट हो. हे काव्य फाल्गुन अमावास्या शके १९२० लिहिले आहे. त्याचे उत्तर भगवंताने चैत्र शु. ०३ शके १९२१ या दिवशी दिले. ते फारच मार्मिक तसेच समष्टीला मार्गदर्शक असे आहे. हे लेखन सेवा सद्गुरूचरणी समर्पण.

**। श्रीकृष्णार्पणमस्तू ।**

# श्री स्वामी समर्थांची पूजा महाराष्ट्रात मनापासून का करतात?

## लोकांना ते इतके आपलेसे का वाटतात?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रात कुठेही गेलात तरी एक नाव हमखास कानावर पडते 'श्री स्वामी समर्थ'. कोणी संकटात असो, कोणी आजारी असो, कोणी गोंधळात असो
पहिल्यांदा ओठांवर येते ते हेच नाव. पण प्रश्न असा आहे, की महाराष्ट्रात इतकी दैवते असताना श्री स्वामी समर्थच इतके जवळचे का वाटतात?

### याचे उत्तर साधे नाही

ते अनुभवात आहे, श्रद्धेत आहे आणि माणसाच्या मनाशी जोडलेले आहे. श्री स्वामी समर्थ फक्त देव नाही, तर आपलेपणाचा आधार आहेत. श्री स्वामी समर्थांना महाराष्ट्रात फक्त देव मानले जात नाही. ते वडील, गुरू, सोबती आणि संरक्षक म्हणूनही ओळखले जातात. कारण त्यांनी कधीही लोकांना भीतीत ठेवले नाही. त्यांनी कधीही 'माझी पूजा केलीच पाहिजे' असे सांगितले नाही. त्यांचा स्वभाव होता थेट साधा आणि स्पष्ट. माणूस जसा आहे तसाच स्वीकारणारे. चुकांवर प्रेमाने बोट ठेवणारे आणि योग्य मार्ग दाखविणारे असे स्वामी होते.

### महाराष्ट्राच्या मातीशी जोडलेले स्वामी

श्री स्वामी समर्थ महाराष्ट्राच्या संस्कृतीशी अगदी खोलवर जोडलेले आहेत. ते जंगलात राहिले, गावागावांत फिरले, सामान्य लोकांत मिसळले. राजा असो वा गरीब शेतकरी स्वामींसाठी सगळे सारखेच होते. त्यांच्या शिकवणीत मोठी-मोठी तत्त्वज्ञाने नव्हती, तर होती साधी वाक्ये जी थेट मनाला भिडतात. 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे.' आजही हे वाक्य हजारो लोकांच्या आयुष्याला आधार देते.

### श्री स्वामी समर्थ आणि महाराष्ट्राचे दुःख

महाराष्ट्राने अनेक संघर्ष पाहिले आहेत. दुष्काळ, कष्ट, गरिबी, मानसिक ताण, अन्याय. अशा वेळी लोकांना मोठ्या चमत्कारांची नव्हे, तर मनाला धीर देणाऱ्या शब्दांची आवश्यक आहे. श्री स्वामी समर्थांनी लोकांच्या वेदना समजून घेतल्या. ते संकटात उभे राहिले. शांतपणे न बोलता देखील मदत केली. म्हणूनच आजही लोक म्हणतात- 'स्वामी बोलत नाहीत, पण काम करतात.'

### श्री स्वामी समर्थांची पूजा भीतीपोटी नाही, प्रेमापोटी

महाराष्ट्रात स्वामींची पूजा भीतीने नव्हे, तर ती प्रेमाने होते. लोक त्यांना नवसाला बांधत नाहीत, तर मनाने जवळ ठेवतात. कोणी रोज पूजा करतो,
कोणी फक्त 'श्री स्वामी समर्थट म्हणतो, कोणी फक्त फोटो पाहून शांत होतो आणि तेवढेच पुरेसे वाटते.

### का वाटतात स्वामी प्रत्येकाच्या इतके जवळचे?

कारण स्वामी कधीही दूर बसलेले देव नव्हते. ते लोकांच्या आयुष्यात उतरलेले होते. ते रागावले, हसले, टोमणे मारले, पण कधीही कोणाला सोडून दिले नाही. आजही लोक सांगतात- 'आम्ही स्वामींना पाहिले नाही, पण त्यांची उपस्थिती नक्की जाणवली.' हीच अनुभूती त्यांना इतके जवळचे बनवते. शेवटी महाराष्ट्रात श्री स्वामी समर्थांची पूजा फक्त परंपरेमुळे नाही, तर विश्वासामुळे केली जाते. ते नाव उच्चारताना मन शांत होते. डोळ्यांत आशा येते आणि मन म्हणते 'काहीही झाले तरी माझे स्वामी आहेत.' आणि कदाचित म्हणूनच महाराष्ट्राच्या प्रत्येक घरात, प्रत्येक मनात, श्री स्वामी समर्थ आजही जीवंत आहेत.

**। श्री स्वामी समर्थ।**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)